RNI No. MAHBIL/2009/३37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ७, अंक ९१] गुरुवार, ऑगस्ट १२, २०२१/श्रावण २१, शके १९४३ [पृष्ठे १, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २२६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**

गोकुळदास तेजपाल रुग्णालय परिसर, ९वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग,
मुंबई ४०० ००१, दिनांक १२ ऑगस्ट २०२१.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसायी अधिनियम, १९६१.**

क्रमांक मुदत-०३२१/प्र. क्र. ३३/अधिनियम.—ज्याअर्थी, शासन अधिसूचना क्र. मभाऔ-१२१५/प्र. क्र. ८८/अधिनियम, दिनांक ८ मार्च २०१६ अन्वये महाराष्ट्र भारतीय औषध परिषद घटीत करण्यात आली आहे व उक्त परिषदेची ५ वर्षांची मुदत दिनांक ७ मार्च २०२१ रोजी संपुष्टात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, कोविड-१९ या साथरोगाच्या प्रादुर्भावामुळे परिषदेच्या नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायींची माहिती आणि कागदपत्रे संकलित करण्याचे कार्य ऑनलाईन नुतनीकरण प्रक्रियेच्या माध्यमातून पूर्ण करण्यासाठी व परिषदेची मतदार यादी अद्यावत करण्यासाठी परिषदेला मुदतवाढ देण्याची विनंती परिषदेने दिनांक ४ मार्च २०२१ च्या पत्रान्वये शासनास केली आहे ;

आणि त्याअर्थी, शासन, महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिनिमय, १९६१ मधील कलम ५ च्या पोट-कलम (६) खालील तरतुदीनुसार परिषदेला या अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापर्यंत मुदतवाढ देत आहे व त्यानंतर उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (३) खालील तरतुदीनुसार परिषदेचे सर्व अधिकार वापरासाठी व परिषदेची कर्तव्ये पार पाडण्यासाठी नवीन परिषद गठित होईपर्यंत, शासन, संचालक आयुष महाराष्ट्र राज्य मुंबई यांची परिषदेवर प्रशासक म्हणून नियुक्ती करीत आहे. यानुसार प्रशासकांनी उक्त अधिनियमात नमुद तरतुदीनुसार परिषदेची निवडणूक प्रक्रिया सुरू करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देशही देण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दौलत देसाई,**
शासनाचे सहसचिव.



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.